अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड



टीम इंडियाचा विजयोत्सव, मुंबईत ३ लाखांचा महासागर रस्त्यावर

सविस्तर वृत्त पान २ वर

www.surajyadigital.com । शुक्रवार, दि. ५ जुलै २०२४ । ▸ वर्ष : २२ वे ▸ अंक : २७६ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने १२

# विजेच्या धक्क्याने गुळवंचीत २४ म्हशींचा मृत्यू

- ओढ्यातील पाणी प्यायला गेल्या होत्या
- विजेची तार पडल्याने पाण्यात करंट उतरला होता
- एका गरीब पशुपालकाचा संसार उघड्यावर
- ५० लाखांचे नुकसान
- संतप्त ग्रामस्थांचा अधिकाऱ्यांना घेराव

✔ सुराज्य/उत्तर सोलापूर

**उत्तर सोलापूर तालुक्यातील गुळवंची गावात गुरूवारी दुपारी एक दुर्दैवी घटना घडली. ओढ्यावर पाणी प्यायला गेलेल्या २४ म्हशींचा विजेच्या धक्क्याने मृत्यू झाला. विजेची तार तुटून पाण्यात पडली होती. त्यामुळे या पाण्यातही करंट उतरलेला होता.पाणी प्यायला उतरल्यानंतर या म्हशींना विजेचा जबर शॉक बसला. या घटनेने गावावर शोककळा पसरली असून सुमारे पन्नास लाखांचे नुकसान झाल्याने या म्हशी पाळणाऱ्या मालकाला मोठा मानसिक धक्का बसला आहे. सायंकाळी वीज वितरणचे अधिकारी पहाणीसाठी आल्यानंतर ग्रामस्थांनी त्यांना घेराव घातला व या पशुपालकाला मदत देण्याची मागणी केली.**



विष्णू भजनावळे

गुळवंची येथील जिल्हा परिषदेच्या शाळेजवळून एक ओढा जातो. त्यावर बंधारा बांधला गेला आहे. पावसामुळे बंधाऱ्यात मोठ्या प्रमाणात पाण्याची साठवणूक झाली आहे.येथील जिल्हा परिषद शाळेच्या मागे असणाऱ्या बंधाऱ्यात पाणी पिण्यासाठी गेलेल्या २४ म्हशी पाण्यात पडलेल्या विजेच्या तारेचे करंट लागून मृत्युमुखी पडल्याने जवळपास पन्नास लाखाहुन अधिक नुकसान झाल्याचे समजते. गुळवंची येथील शेतकरी विष्णू हरिदास भजनावळे हे नेहमी प्रमाणे आपल्या २८ म्हशी चाऱ्यासाठी गोठ्यातून बाहेर सोडल्या होत्या. चारा खाल्यानंतर या म्हशी नेहमीप्रमाणे बंधाऱ्यात पाणी प्यायला गेल्या. कडेला पाण्यात उतरल्यानंतर विजेचा शॉक बसला. एकेक म्हैस ओरडत पाण्यात पडल्या. ते म्हशींच्या मागेच होते. काहीवेळाने ते बंधाऱ्याजवळ आल्यानंतर हा प्रकार दिसताच त्यांना शंका आली. त्यातील चार म्हशींना त्यांनी पाण्याकडे सोडले नाही.त्यामुळे या चार म्हशी सुदैवाने वाचल्या अन्यथा त्यांच्यावरही मृत्यूचा प्रसंग ओढवला असता.ओढ्यातील पाण्यात विजेची तार तुटून पडली होती. त्यामुळे पाण्यात करंट उतरला होता. एकेक म्हशी दगावल्यानंतर होत्याचे नव्हते झाले.आपला उदरनिर्वाह भागवणारे व उत्पन्न मिळवून देणारे पशुधन गेल्यानंतर भजनावळे यांनी हंबरडा फोडला. गुळवंचीचे ग्रामस्थही तिथे येवून त्यांना धीर दिला. ही खबर ग्रामस्थांनी गावातील वायरमनला दिली. तातडीने घटनास्थळी येवून वीजपुरवठा बंद केला. त्यानंतर मृत म्हशी सायंकाळपर्यंत बाहेर काढल्या गेल्या. महसूलच्या कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी येवून पंचनामा केला.

### वडिलोपार्जीत व्यवसाय

विष्णू भजनावळे यांचा वडिलोपार्जित दूध व्यवसाय आहे. दूध व्यवसायात त्यांचे वडील, आई, पत्नी व मुलेही मदत करतात. म्हशी पालनावरच त्यांच्या कुटुंबाचा चरितार्थ चालायचा. दररोज सकाळी-संध्याकाळी दोनशे ते अडीचशे लीटर दूध मिळत असे. हे दूध सोलापूर शहरातील घराघरात घालायचे तसेच होम मैदानावरील दूध मार्केटमध्येही ते दुधाची विक्री करायचे. पंढरपुरी म्हशी असल्याने एक म्हैस दररोज १० ते ११ लीटर दूध द्यायची. दोन एकर शेती आणि मिळणाऱ्या दूध विक्रीतूनच घर चालायचे. पशुधन हरपल्याने त्यांचे प्रचंड आर्थिक नुकसान झाले आहे. आता घर कसे चालवायचे,ही चिंता त्यांना लागून आहे. पंचनामे करून तातडीची आर्थिक मदत मिळावी, अशी मागणी संजय पौळ आणि विष्णू भजनावळे यांनी केली आहे.

▸ बंधाऱ्यावरील तार ही अनेक दिवसांपासून लोंबकळत असल्याचे महावितरण विभागाला कळवले होते.अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या दुर्लक्षपणामुळे नुकसान झाले आहे. ▸ दूध विक्रीतू न मिळणाऱ्या उत्पन्नातूनच कुटुंबाचा उदर निर्वाह चालत होता. २४ म्हशी दगावल्याने भजनावळे कुटुंबाचा संसार उघड्यावर पडला आहे. ▸ दोन एकर शेती पूर्णपणे पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे. शेत पूर्णपणे नापीक आहे. काहीही पेरलं तर उगवत नाही. माळरान म्हणून याचा वापर केला जातो.

## फळ विक्रेत्याची तलावात आत्महत्या

✔ सुराज्य/सोलापूर

विजापूर रोडवरील छत्रपती संभाजी तलावात एका ५५ वर्षीय इसमाने आत्महत्या केली. ही घटना आज गुरुवारी दुपारच्या सुमारास उघडकीस आली. चांदसाब महंमदसाब शेख (वय ३५ रा. लोकमान्य नगर, मजरेवाडी) असे मयताचे नाव आहे.

आज दुपारी २ वाजेच्या सुमारास त्याचा मृतदेह तलावातील पाण्यात तरंगताना आढळून आला. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह शासकिय रुग्णालयात दाखल केले. मयत चांदसाब हा विवाहित असून तो फळ विक्रीचा व्यवसाय करीत होता. दोन दिवसापासून तो घरातून गेला होता. अशी प्राथमिक माहिती मिळाली. या घटनेची नोंद सदर बझार पोलिसात झाली असून यामागचे कारण समजले नाही. हवालदार गायकवाड पुढील तपास करीत आहेत.

## पंढरीत गरिबांवर फिरवला बुलडोझर दादा-काका-मामा मात्र मोकाट

- अतिक्रमण हटाव मोहीम
- व्यापारी-प्रशासन यांच्यात झाली वादावादी

✔ सुराज्य/पंढरपूर

आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर पंढरीत वारकऱ्यांची गर्दी जमू लागताच तसेच व्यापाऱ्यांनी दुकाने थाटत असतानाच नगरपालिकेने गुरूवारी शहरात अतिक्रमण हटाव मोहीम हाती घेतली. पोलीस बंदोबस्तात बुलडोझरच्या सहाय्याने मंदिराकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यांवरील अतिक्रमणे भुईसपाट करून टाकली.

नगरपालिकेने प्रदक्षिणा मार्गावरील अतिक्रमण पाडून टाकले. हटाव मोहीम हाती घेतली. कारवाई सुरू झाल्यानंतर रस्त्याच्याकडेला असलेल्या स्टॉलधारकांमध्ये व नेहमीच्या व्यापाऱ्यांमध्ये एकच खळबळ उडाली. पाडकामाला विक्रेत्यांनी विरोध केल्यानंतर अधिकारी आणि विक्रेते यांच्यात वादावादी झाली.त्यामुळे काहीवेळ वातावरण तंग झाले होते. यंदाच्या आषाढी वारीला १५ लाख भाविक येण्याचा अंदाज वर्तवला आहे. त्यापार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी बुधवारी तातडीने पंढरपूरचा दौरा केला आणि वारीच्या तयारीची पहाणी केली. भाविकांची गर्दी झाल्यानंतर रस्ते अपुरे पडू नयेत म्हणून नगरपरिषदेने अतिक्रमण हटाव मोहीम हाती घेतली. पंढरीच्या वारीपूर्वीच प्रशासनाने सावधगिरी बाळगली आहे. हाथरस आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर होणारी गर्दी लक्षात घेत येथील परिसर विस्तीर्ण करण्यासाठी प्रशासन पाऊल उचलत आहे. मात्र, या कारवाईवर व्यापाऱ्यांनी संताप व्यक्त केला आहे. प्रशासनाने नोटीस न देता अतिक्रमण हटाव मोहीम सुरु केल्याची तक्रार व्यापाऱ्यांनी केली आहे. नगरपालिका ते छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे या अतिक्रमण हटाव मोहिमेला सुरुवात झाली. यावेळी प्रांताधिकारी, डीवायएसपी, नगरपालिका मुखयधिकारी यांच्यासह १०० पेक्षा जास्त कर्मचारी, जेसीबी आणि टेम्पोसह रस्त्यावर उतरल्याचे दिसून आले.

या मार्गावरील व्यापाऱ्यांनी पाऊस आत येऊ नये यासाठी लावलेल्या पाणसळ तोडून टाकण्यास सुरुवात केल्याने व्यापारी आक्रमक झाले. यातच पाणसळ तोडताना व्यापाऱ्यांची लोखंडी शटर देखील उचकटून टाकल्याने या गोरगरीब व्यापाऱ्यांना हजारो रुपयांचा भुर्दंड बसला आहे. एकाबाजूला शहरात प्रत्येक प्रमुख मार्गावर राजकीय आशीर्वादाने शेकडो खोके, टपऱ्या आणि कार्यालये सुरु असताना यावर कारवाईचे धाडस मात्र प्रशासन दाखवत नसून गोरगरीब व्यापाऱ्यांच्या दुकानावरील पत्रे तोडत आहे, अशी संतप्त भावना व्यापाऱ्यांनी व्यक्त केली. प्रशासनाने आम्हाला नोटीस दिल्या असत्या तर आम्ही स्वतः दुकानावर निवाऱ्यासाठी लावलेली पाणसळ हटविल्या असत्या, अशी संतप्त भूमिका व्यापाऱ्यांनी व्यक्त केली.

व्यापाऱ्यांनी पदपथावर दुकाने थाटली असल्यामुळे नागरिकांना रस्त्यावरून चालत जावे लागत आहे. यामुळे नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे. म्हणून नगर परिषदेने पदपथ व रस्त्यावर केलेली अतिक्रमणे काढण्यास सुरुवात केली आहे. असे मुख्याधिकारी डॉ.प्रशांत जाधव यांनी सांगितले.



पंढरपूर : शहरात अतिक्रमण हटाव मोहीम सुरु केल्यानंतर रस्त्यावर उतरलेले व्यापारी.

### काका-मामा-दादांची अतिक्रमणे तशीच...

बेकायदा टपऱ्या आणि खोक्याबाबत विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देणे टाळत प्रशासनानेही ही मोहीम सुरु ठेवली आहे. आता ज्या पद्धतीने शहरातील व्यापाऱ्यांवर अतिक्रमणाची कारवाई झाली, तशी राजकीय आशीर्वादाने शहरात असणाऱ्या बेकायदा अतिक्रमित इमारती, खोके आणि टपऱ्या हटविण्याची मागणी व्यापाऱ्यांची आहे. अतिक्रमण काढताना नगर परिषदेकडून दुजाभाव केला जात असून काका, मामा, दादा यांच्या कार्यकर्त्यांची अतिक्रमणे ठेवली असून गोरगरिबांची अतिक्रमणे काढली आहेत. यामुळे नगर परिषदेच्या कारभारा विषयी नागरिकांतून तीव्र संताप व्यक्त होत आहे.

## शेतातून ५ लाखांची चोरी; तिघांवर गुन्हा दाखल

✔ **वैराग** : भावकीतील शेत जमिनीतून शेतीमाल आणि शेतातील अवजारे असा ५ लाखांचा माल चोरून नेण्याची घटना पिंपरी (ता.बार्शी) येथे सहा महिन्यांपूर्वी घडली. याप्रकरणी वैरागच्या पोलिसांनी तिघांवर गुन्हा दाखल केला आहे. या संदर्भात मधुकर तुकाराम काशींद (रा.पिंपरी ता.बार्शी) यांनी वैराग पोलिसात फिर्याद दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी अशोक प्रभू शेवाळे (रा.काळभोर पुणे) किशोर बाळासाहेब काशींद आणि बाळासाहेब दत्तू काशींद (दोघे रा.पिंपरी ता.बार्शी) अशा तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला. या तिघांनी मिळून २८ जानेवारी रोजी दुपारच्या सुमारास मधुकर काशींद यांच्या शेतातून शेतातील माल आणि शेतातील अवजारे चोरून नेले, असे त्यांच्या फिर्यादीत नमूद आहे.

## मंगळवेढा बस स्थानकात वृद्ध महिलेचे मंगळसूत्र पळवले



✔ **मंगळवेढा** : बसमध्ये प्रवेश करताना गर्दीचा फायदा घेऊन चोरट्याने एका ७० वर्षीय वृद्ध महिलेच्या गळ्यातील ६० हजार रुपये किमतीचे मंगळसूत्र पळवले. ही चोरी गेल्या शुक्रवारी दुपारच्या सुमारास घडली. या संदर्भात तारामती उत्तम शिवशरण (वय ७० रा.खवे ता.मंगळवेढा) यांनी पोलिसात फिर्याद दाखल केली. त्या मंगळवेढा येथील बाजारासाठी शुक्रवारी सकाळी आल्या होत्या. बाजार करून त्या दुपारी गावाकडे जाण्यासाठी बस स्थानकात आल्या होत्या. खवे येथे जाणाऱ्या बसमध्ये त्या प्रवेश करीत होत्या. त्यावेळी चोरट्याने त्यांच्या गळ्यातील १५ ग्रॅम सोन्याचे मंगळसूत्र पळवले. त्यानंतर त्यांनी पोलिसात फिर्याद दाखल केली.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



लाडकी बहीण, पोरका म्हेवणा !

कल्याण
268-64-347

मुंबई
369-89-568

## नातवंडांच्या खांद्यावर घडतेय वारी, आजीबाई येतायेत पंढरीच्या दारी!

- संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर पालखी सोहळ्यात श्रावणबाळांचे अलभ्य दर्शन

✔ सुराज्य/विशेष प्रतिनिधी

श्रावण बाळाची कथा जुन्या पिढीतील लोकांना चांगलीच ठाऊक आहे.आई-वडिलांनी आपल्याला जग दाखवले.लहानाचे मोठे केले.आई-वडील हेच आपले दैवत असते.आई-वडिलांचे ऋण फेडण्यासाठी म्हणून श्रावणबाळाने माता-पित्यांना खांद्यावर घेवून पायी काशीची वारी घडवली,अशी ती कथा आहे.आज बदलेल्या जमान्यातही श्रावणबाळ आपल्याला दिसतील.पंढरपूरकडे निघालेल्या संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखी सोहळ्यात त्याची अनुभूती आली.

इथे एक नाही तर दोघे श्रावणबाळ आहेत. पुणे स्थित फलटणचे प्रशांत आणि महेश अशी त्यांची नावे आहेत. प्रशांत आणि महेश हे दोघही आई-वडिलांची नाही तर चक्क आजीविषयी कृतज्ञता व्यक्त करत आहे. सुंदर आजी असे त्यांचे नाव आहे. त्यांचे वय थकले आहे. त्या नव्वदीत आहेत. गुडघे काम देत नाहीत. तरीही श्रीविठुरायाच्या भेटीची त्यांना ओढ लागली आहे. आजीला चालणे होत नसल्याने या दोनही नातवांनी आपल्या खांद्यावर आजीला घेवून ते पंढरपूरकडे येत आहेत. आजीसह दोघांच्याही कपाळ्यावर असणारा बुक्का आणि चंदनाचा टीळा अत्यंत तेजोमय असतो.पालखी सोहळ्यात चालताना दोघांचीही हास्यमुद्रा अनेक भक्ष भाविकांचे लक्ष वेधून घेत आहे. भागवत संप्रदायातल्या प्रत्येकाला लेकुरवाळा विठुरायाच्या भेटीची आस निर्माण करते. तहान-भूक, वय, जेष्ठ, श्रेष्ठ, कनिष्ठ सारे काही विसरून ही आषाढीवारी फुलत राहते पंढरीच्या दिशेने. यात हौशे-नवशे देखील असतात. पण काहीजण असतात, जे विठुरायावरची श्रद्धा, भक्ती हृदयात ठेवून पंढरीच्या दिशेने जायची इच्छा व्यक्त करतात.. अनेकांना ते शक्य होते, अनेकांना शक्य होत नाही.. ज्यांना शक्य होत नाही, त्यांच्यासाठी काही श्रावण बाळ असेही असतात, जे वाटेल ते सायास करत अशा अशक्य गोष्टी शक्य करून ठेवतात. अनेकदा म्हटले जाते की, नवीन पिढीला अध्यात्माचा फारसा वारसा नाही. परंतु असे नाही. पुण्यासारख्या महागड्या शहरांमध्ये मॉलमध्ये काम करणारा प्रशांत नावाचा नातू या सुंदर आजींसाठी सारथी बनला आहे.

### नातू आधार बनला

वय नव्वद..पण पंढरीला जाण्याची ओढ मात्र, अगदी तरुणपणाची... गेली १० वर्षे ह्या आजीबाई पायी पंढरीला जातात. गेल्या तीन वर्षांपासून गुडघे थकले, दमले. त्यामुळे चालता येत नाही, अशावेळी त्यांचे नातू त्यांचे आधार बनले. पंढरीच्या दिशेने चाललेल्या ज्ञानोबारायांच्या पालखी सोहळ्यात नातवाच्या खांद्यावर बसून विठुरायाचे त्यांना दर्शन घ्यायचे आहे.

